299

ISO 9001:2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र,
जा.क्र.नासुके/१/कावि/३४८/२०१७
दि. ९८/०९/२०१७

**विषय :- शासकीय सोयी / सुविधांकरिता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयं साक्षांकित प्रती स्वीकारणेबाबत ...**

**संदर्भ :- १) माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, शासन निर्णय क्र.MH-९०२१/११/२०१३-DIT(MH)-DIT(MH)/३९ दि.१४/०८/२०१३**
**२) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/६०९/२०१३ दि.०२/०९/२०१३**
**३) शासन निर्णय क्र.प्रसुधा १६१४/३४५/प्र.क्र.७१/१८-अ दि.०९/०३/२०१५**
**४) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/९८/२०१५ दि.२३/०३/२०१५**
**५) क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.२२७/नवि-२० दि.०८/०९/२०१७**

**परिपत्रक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रामार्फत नागरिकांना विविध प्रकारचे दाखले / परवाने विहित कालावधीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येतात. सदर दाखले / परवाने साठी अर्ज, आवश्यक असणारी कागदपत्रे इ. संबंधित विभागांनी निर्धारित केलेली आहेत.

महाराष्ट्र शासनाचे संदर्भ क्र.१ चे निर्णयानुसार संदर्भ क्र.२ चे परिपत्रकान्वये, मनपामार्फत देण्यात येणा-या विविध प्रकारचे दाखले / परवाने मध्ये प्रतिज्ञापत्र दाखल करणे आवश्यक असते, अशा सर्व दाखले / परवाने साठी अर्जदाराच्या प्रतिज्ञापत्राऐवजी, स्वघोषणापत्राचा समावेश अर्जामध्ये करणेबाबत यापूर्वीच सुचना दिलेल्या आहेत.

संदर्भ क्र.१ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन सर्व शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादि शासकीय संस्थांमध्ये शपथपत्र (Affidavit) ऐवजी स्वयं घोषणापत्र (Self-Declaration) व प्रमाणपत्रे / कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (Attested Copies) ऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती (Self-Attested Copies) स्वीकृत करण्यासंदर्भात कार्यपध्दती स्विकारण्याबाबतचे आदेश क्र.३ चे शासन निर्णयान्वये निर्गमित करणेत आलेले आहेत. त्यानुसार क्र.४ अन्वये सर्व विभागांना यापूर्वीच अवगत करणेत आलेले आहे.

संदर्भ क्र.५ अन्वये मनपा कडील सर्व कार्यालयांमार्फत नागरीकांना कोणत्या बाबींसाठी अधिनियम / नियमानुसार अर्जासोबत शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे आणि कोणत्या बाबींसाठी अर्जासोबत शपथपत्र बंधनकारक नाही याची तपशीलवार यादी तयार करुन शासनास तात्काळ पाठविणेसंबंधी कळविले आहे. तसेच, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार अधिसूचित केलेल्या लोकसेवां संबंधात शपथपत्राबाबत शासनाने पाठविलेल्या नमुन्यात माहिती सादर करणेसंबंधी कळविले आहे.

...२

सबब उपरोक्त विषयासंबंधी सोबत जोडलेल्या **"प्रपत्र अ"** मध्ये आपले विभागासंबंधी माहिती सादर करावी. तसेच, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत ज्या विभागांच्या सेवा देणेत येत आहेत अशा विभागांनी उपरोक्त प्रमाणे शासनाने मागणी केलेनुसार **"प्रपत्र ब"** मध्ये आपले विभागाची माहिती सादर करावी. सदर माहिती शासनास तात्काळ सादर करावयाची असलेने दि.१९/०९/२०१७ पर्यंत आपले विभागाची माहिती नागरी सुविधा केंद्र विभागाकडे पाठवावी. याकामी विलंब अपेक्षित नाही.

**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

सोबत :- १) संदर्भ क्र.५ चे शासनाकडील पत्र
२) प्रपत्र अ व ब

प्रति,
सर्व विभागप्रमुख,
--------------------------- विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# प्रपत्र "अ"

## (सर्व विभागांनी पाठवावयाची माहिती)

| अ.क्र. | लोकसेवा | शपथपत्र स्विकारले जाते | स्वघोषणापत्र स्विकारले जाते | साक्षांकित प्रती स्विकारल्या जातात | स्वयं साक्षांकित प्रती स्विकारल्या जातात |
|---|---|---|---|---|---|
| | | होय / नाही | होय / नाही | होय / नाही | होय / नाही |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

विभागप्रमुख,

--------------------------- विभाग,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी - ४११ ०१८.

# प्रपत्र "ब"

## (महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत सेवा देणारे विभागांनी पाठवावयाची माहिती)

| अ.क्र. | लोकसेवा | शपथपत्र स्विकारले जाते | स्वघोषणापत्र स्विकारले जाते | साक्षांकित प्रती स्विकारल्या जातात | स्वयं साक्षांकित प्रती स्विकारल्या जातात |
|---|---|---|---|---|---|
| | | होय / नाही | होय / नाही | होय / नाही | होय / नाही |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

विभागप्रमुख,

--------------------------- विभाग,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी - ४११ ०१८.